क्रमांक : २९

**महाराष्ट्र विधानपरिषद**

**पत्रक भाग दोन**

**शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६/ फाल्गुन ९, १९४७ (शके)**

**सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापासून अर्थसंकल्पीय प्रकाशनांची ट्रॉली बॅग/ हॅन्ड बॅग व पेनड्राईव्हचे वितरण बंद करण्यात आल्याबाबत.**

२९ . विधानपरिषदेच्या सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, विधानपरिषदेत राज्याचा अर्थसंकल्प सादर केल्यानंतर ट्रॉली बॅग/ हॅन्ड बॅग मधून अर्थसंकल्पीय प्रकाशनाचा पेनड्राईव्ह व त्या सोबत काही महत्वाची प्रकाशने देण्यात येत होती. तथापि, आता सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापासून ट्रॉली बॅग/ हॅन्ड बॅग व पेनड्राईव्ह वितरण करणे बंद करण्याचा निर्णय शासनस्तरावर घेण्यात आलेला असून, राज्याचा अर्थसंकल्प विधानमंडळात सादर झाल्यानंतर लगेचच सर्व अर्थसंकल्पीय प्रकाशने महाराष्ट्र शासनाच्या https://beams.mahakosh.gov.in तसेच महाराष्ट्र विधानमंडळाच्या https://mls.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर बाब सर्व सन्माननीय सदस्यांना अवगत करण्यात येत आहे.

---

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०२६

**(डॉ. विलास आठवले)**
सचिव (३),
महाराष्ट्र विधानपरिषद.

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य (मंत्री व राज्यमंत्री महोदयांसह)

२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.

३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

४) संगणक कक्ष

५) एम.के.सी.एल.कक्ष